

# बुद्धवाणी

भगवान बुद्धांची निवडक वचने



MR
891.468
Sa 19 B

MR
891.468
Sa19B

INDIAN INSTITUTE
OF
ADVANCED STUDY
LIBRARY, SHIMLA

# बुद्धवाणी

भगवान बुद्धांची निवडक वचने

Entered

# बुद्धवाणी

भगवान बुद्धांची निवडक वचने

संकलन

**अ. म. सहस्रबुद्धे**

लोकवाङ्मय गृह

**बुद्धवाणी (भगवान बुद्धांची निवडक वचने)** / अ. म. सहस्रबुद्धे
Buddhawani (Bhagawan Buddhanchi Nivadak Vachane
A. M. Sahasrabudhe

Library IIAS, Shimla
MR 891.468 Sa 19 B
00124284

म / ९५१
पहिली आवृत्ती (I) : ६ डिसेंबर २००५
डॉ. बाबासाहेब आंबेडकर परिनिर्वाण दिन
दुसरी आवृत्ती (I) : नोव्हेंबर २००६

MR
891.468
Sa19B

मूल्य : ४० रुपये ISBN 81-88284-62-9

124284
31.3.08

मुद्रक/प्रकाशक
प्रकाश विश्वासराव
लोकवाङ्मय गृह
भूपेश गुप्ता भवन
८५, सयानी रोड
प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५

मुद्रणस्थळ
न्यू एज प्रिंटिंग प्रेस
भूपेश गुप्ता भवन
८५, सयानी रोड
प्रभादेवी
मुंबई - ४०० ०२५

*सब्बपापस्स अकरणं कुसलस्स उपसम्पदा।*
*सचित्तपरियोदपनं, एतं बुद्धान सासनं॥*

*पापांपासोनि निवृत्ति प्रवृत्ती कुशलाकडे।*
*स्वचित्त-शुद्धीकरण बुद्धांचे हे प्रशासन॥*

(धम्मपद १४-५)

कोणतेही पापकृत्य न करणे, पुण्याचा संग्रह करणे आणि चित्त नेहमी शुद्ध राखणे हीच बुद्धांची शिकवण आहे.

# ग्रंथसंक्षेप

अं.नि. - अंगुत्तरनिकाय

दी.नि. - दीघनिकाय

ध.प. - धम्मपद

भ.बु. - भगवान बुद्ध (आनंद)

म.नि. - मज्झिमनिकाय

वि.पि. - विनयपिटक

सं.नि. - संयुत्तनिकाय

सु.नि. - सुत्तनिपात

# अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| १. | सरणत्तय | १ |
| २. | बुद्धशासन | २ |
| ३. | महामंगल | ३ |
| ४. | चार आर्यसत्ये | ५ |
| ५. | आर्य अष्टांगिक मार्ग | ६ |
| ६. | प्रतीत्यसमुत्पाद | ८ |
| ७. | सात धर्मरत्ने | १० |
| ८. | दहा शीले | १२ |
| ९. | दहा पापे | १३ |
| १०. | दहा गुण | १४ |
| ११. | मुक्तिमार्ग | १५ |
| १२. | अमृताची शेती | १६ |
| १३. | अनात्मा | १७ |
| १४. | अनित्यता | १८ |
| १५. | अहिंसा | २० |
| १६. | सत्य | २१ |
| १७. | ब्रह्मविहार | २२ |

| | | |
|---|---|---|
| १८. | मैत्रीभावना | २३ |
| १९. | मन | २४ |
| २०. | तृष्णा | २६ |
| २१. | क्रोध | २८ |
| २२. | सुख | ३० |
| २३. | गृहस्थधर्म | ३१ |
| २४. | कर्म | ३५ |
| २५. | पाप-पुण्य | ३६ |
| २६. | जागृती | ३८ |
| २७. | अधोगती | ४० |
| २८. | सुभाषित वाणी | ४१ |
| २९. | जीवन्मुक्त कोण? | ४२ |
| ३०. | भिक्षू कोण? | ४३ |
| ३१. | ब्राह्मण कोण? | ४५ |
| ३२. | चांडाळ कोण? | ४७ |
| ३३. | शहाणा कोण? | ४८ |
| ३४. | मूर्ख कोण? | ४९ |
| ३५. | मृत्यू | ५० |
| ३६. | शोक कोणासाठी? | ५१ |
| ३७. | निर्वाण | ५३ |
| ३८. | संकीर्ण | ५५ |



# सरणत्तय

बुद्धं सरणं गच्छामि ।
धम्मं सरणं गच्छामि ।
संघं सरणं गच्छामि ।
दुतियम्पि बुद्धं सरणं गच्छामि ।
दुतियम्पि धम्मं सरणं गच्छामि ।
दुतियम्पि संघं सरणं गच्छामि ।
ततियम्पि बुद्धं सरणं गच्छामि ।
ततियम्पि धम्मं सरणं गच्छामि ।
ततियम्पि संघं सरणं गच्छामि ।

(खुद्दकपाठो)

मी बुद्धाला शरण जातो.
धर्माला शरण जातो.
संघाला शरण जातो.
दुसऱ्यांदाही मी बुद्धाला शरण जातो.
धर्माला शरण जातो.
संघाला शरण जातो.
तिसऱ्यांदाही मी बुद्धाला शरण जातो.
धर्माला शरण जातो.
संघाला शरण जातो.

या तीन शरणांना 'तीन रत्ने' किंवा 'शरणत्रयी' असेही म्हणतात.



# बुद्धशासन

१. निंदा न करणे

२. हिंसा न करणे

३. नीतिनियमांचे पालन करणे

४. आहार उचित तेवढाच घेणे

५. एकांतात राहणे

६. चित्ताला उच्च विचारात निमग्न करणे

ही बुद्धांची शिकवण आहे.

ध.प. (बुद्धवग्गो)



# महामंगल

१. मूर्खांच्या सहवासापासून दूर राहणे, ज्ञानी लोकांच्या संगतीत राहणे आणि पूज्य जनांची पूजा करणे हे उत्तम मंगल आहे.

२. योग्य देशात वास्तव्य करणे, पदरी पुण्याचा संचय असणे आणि मनाला सन्मार्गात मग्न करणे हे उत्तम मंगल आहे.

३. बहुश्रुतपणा, कलाकौशल्य, सद्वर्तनाची सवय आणि समयोचित भाषण हे उत्तम मंगल आहे.

४. आईवडिलांची सेवा करणे, बायकोमुलांचे योग्य रीतीने पालन करणे आणि व्यवस्थितपणे कर्म करणे हे उत्तम मंगल आहे.

५. दानधर्म करणे, पुण्याचरण, कृतज्ञता आणि अनिंद्य कर्मानुष्ठान हे उत्तम मंगल आहे.

६. दुष्कृत्यांपासून दूर राहणे, पापाचरणापासून निवृत्ती, मद्यपानाविषयी संयम आणि धर्माचरणात तत्परता हे उत्तम मंगल आहे.

७. सत्पुरुषांविषयी पूज्य भाव, नम्रता, संतोषवृत्ती व वेळोवेळी धर्मश्रवण हे उत्तम मंगल आहे.

८. क्षमा, मृदू संभाषण, श्रमणांचे दर्शन व धर्मचिकित्सा हे उत्तम मंगल आहे.

९. तपश्चर्या, इंद्रियनिग्रह, आर्यसत्यांचे[१] यथार्थ ज्ञान व निर्वाण साक्षात्कार हे उत्तम मंगल आहे.

---

१. दुःख, दुःखसमुदय, दुःखनिरोध व दुःखनिरोधाचा मार्ग ही चार आर्यसत्ये आहेत.

१०. सुख-दु:खात चित्तवृत्ती ढळू न देता शोकरहित, विकाररहित व क्षेमयुक्त राहणे हे उत्तम मंगल आहे.

१-१०. सु.नि. (महामंगलसुत्त)



# चार आर्यसत्ये

१. पहिले आर्यसत्य दु:ख आहे. जन्म दु:ख आहे. म्हातारपण दु:ख आहे. व्याधी दु:ख आहे. मरण दु:ख आहे. अप्रियाचा संयोग हे दु:ख आहे. इच्छित गोष्ट न मिळणे दु:ख आहे.

२. दु:खसमुदय म्हणजे दु:खोत्पती हे दुसरे आर्यसत्य आहे. ही तृष्णा दु:खाचे मूळ कारण आहे. ही जिथे तिथे सुख शोधीत असते व पुन्हा पुन्हा उद्भवत असते. तृष्णा म्हणजे अतृप्ती. ती तीन प्रकारची असते- कामतृष्णा, भवतृष्णा आणि विभवतृष्णा. कामतृष्णा म्हणजे विषयभोगांची तृष्णा. भवतृष्णा म्हणजे जन्म घेण्याची इच्छा आणि विभवतृष्णा म्हणजे विनाशतृष्णा.

३. दु:खनिरोध म्हणजे दु:खाचा नाश हे तिसरे आर्यसत्य आहे. दु:खनाश हा तृष्णानाशानेच करता येतो. तृष्णेचा अत्यंत वैराग्याने निरोध, त्याग हे तिसरे सत्य आहे.

४. दु:खनिरोधगामिनी पटिपदा (दु:खनाशाचा मार्ग) हे चौथे आर्यसत्य आहे. दु:खनाशाचा हा मार्ग म्हणजे आर्य अष्टांगिक मार्ग.

१-४. (धम्मचक्कपवत्तनसुत्त)



# आर्य अष्टांगिक मार्ग

१. सम्यक् दृष्टी, सम्यक् संकल्प, सम्यक् वचन, सम्यक् कर्मान्त, सम्यक् आजीव, सम्यक् व्यायाम, सम्यक् स्मृती व सम्यक् समाधी हा आर्य अष्टांगिक मार्ग आहे.

२. सम्यक् दृष्टी : दुःखाविषयी ज्ञान, दुःख कसे व का उत्पन्न होते याविषयीचे ज्ञान, ते कसे टाळता येईल याविषयीचे ज्ञान व ते टाळण्याचा अचूक मार्ग कोणता याविषयीचे ज्ञान याला सम्यक् दृष्टी म्हणतात.

३. सम्यक् संकल्प : सद्विचार, नैष्कर्म्य संकल्प म्हणजे एकांतवाससुखाची आवड, अव्यापाद संकल्प म्हणजे प्राणिमात्रांवर शुद्ध प्रेम आणि अविहिंसा संकल्प म्हणजे दुसऱ्याला व स्वतःला त्रास होऊ नये अशी इच्छा. या तीन संकल्पांना सम्यक् संकल्प म्हणतात.

४. सम्यक् वचन : खोटे न बोलणे, चहाडी न करणे, कठोर शब्द न उच्चारणे आणि वायफळ न बोलणे यांना सम्यक् वचन म्हणजेच सम्यक् वाणी म्हणतात.

५. सम्यक् कर्मान्त : हिंसा न करणे, चोरी न करणे व व्यभिचार न करणे यांना सम्यक् कर्मान्त म्हणजेच सम्यक् वर्तन, सदाचरण म्हणतात.

६. सम्यक् आजीव : वाईट मार्गाने आपली उपजीविका न करता ती सन्मार्गानेच करणे याला सम्यक् आजीव म्हणजेच योग्य चरितार्थ म्हणतात.

७. सम्यक् व्यायाम : जे वाईट विचार मनात आले नसतील ते उत्पन्न न होऊ देण्याविषयी प्रयत्न; जे वाईट विचार मनात उद्भवले असतील ते नाहीसे करण्याचा प्रयत्न; जे सुविचार मनात उद्भवले नसतील ते उत्पन्न करण्याचा प्रयत्न व जे सुविचार मनात उद्भवले असतील ते

वाढवून त्यांना पूर्णतेला नेण्याचा प्रयत्न या चार मानसिक प्रयत्नांना सम्यक् व्यायाम म्हणतात.

८. सम्यक् स्मृती : शरीर अपवित्र पदार्थांनी तयार झाले आहे हा विवेक जागृत ठेवणे; शरीरातील सुख-दु:खादी वेदनांचे वारंवार अवलोकन करणे; स्वचित्ताचे अवलोकन करणे आणि जागरूक राहणे यांना सम्यक् स्मृती म्हणतात.

९. सम्यक् समाधी : अष्टांगिक मार्गातली ही शेवटची पायरी. सम्यक् समाधी साधण्याच्या चार ध्यानावस्था आहेत—

पहिल्या ध्यानात साधक सगळ्या कामवासनांचा निरोध करून व इतर दुष्ट मनोवृत्तींचा निरोध करून वितर्क व विचारयुक्त अशी एकाग्रता प्राप्त करून घेतो.

दुसऱ्या ध्यानात वितर्क-विचारांचा लोप होऊन प्रीती, सुख आणि एकाग्रता शिल्लक राहतात.

तिसऱ्या ध्यानात प्रीतीचा लोप होऊन फक्त सुख आणि एकाग्रता शिल्लक राहतात.

चौथ्या ध्यानात सुखाचाही लोप होतो व फक्त उपेक्षा म्हणजे अनासक्त भाव व एकाग्रता शिल्लक राहतात.

१०. अमृताकडे घेऊन जाणाऱ्या मार्गांमध्ये आर्य अष्टांगिक मार्ग परम मंगलमय मार्ग आहे.

१-९. दी.नि. (महासतिपट्ठानसुत्त)

१०. म.नि. (मागंदिय सुत्तन्त)



# प्रतीत्यसमुत्पाद

१-२ अविद्येपासून संस्कार

२-३ संस्कारांपासून विज्ञान

३-४ विज्ञानापासून नामरूप

४-५ नामरूपांपासून षडायतन

५-६ षडायतनांपासून स्पर्श

६-७ स्पर्शांपासून वेदना

७-८ वेदनांपासून तृष्णा

८-९ तृष्णांपासून उपादान

९-१० उपादानापासून भव

१०-११ भवापासून जाती

११-१२ जातीपासून जरा-मरण-शोक-आक्रोश-दु:ख-असंतोष उत्पन्न होतात. अशा प्रकारे दु:खनिर्मितीची प्रक्रिया चालू राहते. याला म्हणतात प्रतीत्यसमुत्पाद.[१]

१-२ अविद्येच्या नाशाने संस्कारांचा अंत

२-३ संस्कारांच्या नाशाने विज्ञानाचा अंत

---

१. प्रतीत्यसमुत्पाद (कार्यकारणभाव) ही दु:खाचे कारण शोधून काढणारी परंपरा किंवा नियम आहे. हा नियम परस्परांवर अवलंबून असलेल्या १२ कारणांना आणि त्यांच्या परिणामांना लागू होतो. प्रतीत्यसमुत्पादाचे विवरण एकूण १२ अंगांमध्ये होत असल्याने त्याला द्वादशांग प्रतीत्यसमुत्पादही म्हणतात.

३-४ विज्ञानाच्या नाशाने नामरूपाचा अंत

४-५ नामरूपाच्या नाशाने षडायतनांचा अंत

५-६ षडायतनांच्या नाशाने स्पर्शांचा अंत

६-७ स्पर्शांच्या नाशाने वेदनेचा अंत

७-८ वेदनेच्या नाशाने तृष्णेचा अंत

८-९ तृष्णेच्या नाशाने उपादानांचा अंत

९-१० उपादानांच्या नाशाने भवाचा अंत

१०-११ भवाच्या नाशाने जातीचा अंत

११-१२ जातीच्या नाशाने जरा-मरण-शोक-आक्रोश-दु:ख-असंतोष यांचा अंत. अशा प्रकारे दु:खसमूहाचा अंत होतो. याला म्हणतात प्रतीत्यसमुत्पाद.

१-१२. सं.नि.



# सात धर्मरत्ने

१. धर्माच्या या सात रत्नांना तुम्ही अवश्य धारण करा : (१) स्मृतिप्रस्थान, (२) सम्यक् प्रधान (प्रयत्न), (३) ऋद्धिपाद (दिव्य शक्ती), (४) इंद्रिय, (५) बल, (६) बोध्यंग व (७) मार्ग.

२. स्मृतिप्रस्थान चार प्रकारचे आहेत : (१) शरीराविषयी जागरूक राहणे, (२) वेदनांविषयी जागरूक राहणे, (३) चित्ताविषयी जागरूक राहणे, (४) धर्माविषयी जागरूक राहणे.

३. सम्यक् प्रधान चार प्रकारचे आहेत : (१) सद्गुणांचे संरक्षण, (२) सद्गुणांचे संवर्धन, (३) दुर्गुणांचा परित्याग, (४) नवे दुर्गुण उद्भवू नयेत यासाठी प्रयत्न.

४. ऋद्धिपाद म्हणजे असाधारण क्षमतेच्या प्राप्तीसाठी : (१) दृढ संकल्प, (२) उद्योग, (३) उत्साह, (४) आत्मसंयम.

५. इंद्रिय : म्हणजे आध्यात्मिक विकासाच्या शक्ती. त्या पाच आहेत : (१) श्रद्धा, (२) समाधी, (३) वीर्य, (४) स्मृती व (५) प्रज्ञा.


६. बल पाच आहेत : (१) श्रद्धाबल, (२) समाधिबल, (३) वीर्यबल, (४) स्मृतिबल व (५) प्रज्ञाबल.

७. बोध्यंग सात आहेत : (१) स्मृती, (२) धर्मान्वेषण अथवा पुण्य, (३) वीर्य, (४) प्रीती, (५) प्रश्रब्धी अथवा शांती, (६) समाधी, (७) उपेक्षा.

८. मार्ग आठ अंगांचा आहे : (१) सम्यक् दृष्टी, (२) सम्यक् संकल्प, (३) सम्यक् वचन, (४) सम्यक् कर्मान्त, (५) सम्यक् आजीव, (६) सम्यक् व्यायाम, (७) सम्यक् स्मृती व (८) सम्यक् समाधी.

९. या सदतीस बोधीपक्षीय धर्मांच्या द्वारे मी धर्मव्यवस्था केली आहे. यांना मी 'सप्तत्रिंशत शिक्षमाण धर्म' म्हटले आहे.

१-९. दी.नि. (महापरिनिब्बाणसुत्त)



# दहा शीले

१. हिंसेपासून अलिप्त राहण्याच्या आज्ञेचे मी पालन करीन.

२. न दिलेले घेण्यापासून म्हणजेच चोरीपासून अलिप्त राहण्याच्या आज्ञेचे मी पालन करीन.

३. व्यभिचारापासून अलिप्त राहण्याच्या आज्ञेचे मी पालन करीन.

४. खोटे बोलण्यापासून अलिप्त राहण्याच्या आज्ञेचे मी पालन करीन.

५. दारू वगैरे मादक पदार्थांपासून अलिप्त राहण्याच्या आज्ञेचे मी पालन करीन.

६. अवेळी भोजन करण्यापासून अलिप्त राहण्याच्या आज्ञेचे मी पालन करीन.

७. नाच, गाणे-बजावणे इत्यादीपासून अलिप्त राहण्याच्या आज्ञेचे मी पालन करीन.

८. पुष्पमाला, सुगंधी उटणे, नटणे-मुरडणे यांच्यापासून अलिप्त राहण्याच्या आज्ञेचे मी पालन करीन.

९. उंच शयनासने किंवा सजवलेल्या शय्या यांच्यापासून अलिप्त राहण्याच्या आज्ञेचे मी पालन करीन.

१०. सोने-रुपे इत्यादींपासून अलिप्त राहण्याच्या आज्ञेचे मी पालन करीन.

(दस सिक्खापद)

यांनाच 'दहा शिक्षापदे' किंवा 'दहा निषेधात्मक आज्ञा' म्हणतात.



# दहा पापे

१. हिंसा
२. चोरी
३. व्यभिचार

ही तीन कायिक पापे आहेत.

१. खोटे बोलणे
२. चहाडी करणे
३. कठोर भाषण
४. व्यर्थ बडबड

ही चार वाचिक पापे आहेत.

१. परद्रव्यासक्ती
२. क्रोध
३. नास्तिकता

ही तीन मानसिक पापे आहेत.

(दस अकुसलकम्मपथ)

या दहा पापांच्या त्यागाला पालि-त्रिपिटकात 'मनुष्यधर्म' म्हटले आहे.



# दहा गुण

१. दान

२. शील

३. सर्वसंगपरित्याग (नेखम्मा)

४. ज्ञान (पन्ना)

५. चिकाटी (विरीया)

६. सहनशीलता (खांती)

७. सत्यनिष्ठता (सच्च)

८. निर्धार (अधिथ्थान)

९. मैत्री (मेत्ता)

१०. समबुद्धी (उपेख्खा)

भ.बु. (पृ. ६७-६८)



# मुक्तिमार्ग

योग्य ज्ञानाने योग्य विचार निर्माण होतात.
योग्य विचारांतून योग्य वाणी निर्माण होते.
योग्य वाणीतून योग्य कृती होते.
योग्य कृतीमधून योग्य जीवनक्रम तयार होतो.
योग्य जीवनक्रमातून प्रयत्न योग्य दिशेने होत राहतो.
योग्य प्रयत्नातून योग्य जागरूकता निर्माण होते.
योग्य जागरूकतेमधून योग्य प्रकारचे शहाणपण येते.
अशा शहाणपणातून मुक्ती प्राप्त होते.

भ.बु. (पृ. ७७.)



# अमृताची शेती

१. श्रद्धा हे माझे बियाणे आहे. तपश्चर्या ही माझी वृष्टी आहे. प्रज्ञा हा माझा नांगर आहे. पापलज्जा हा या नांगराचा दंड आहे. चित्त ही दोरी आहे. जागृती हा फाळ आहे.

२. इंद्रियांचे तसेच वाणीचेही मी संयमन केले आहे. आहारही माझा संयमित आहे.

३. सत्य ही माझी खुरपणी आहे आणि निर्वाणाकडे नेणारा उत्साह हा माझा बैल आहे. तो अशा मार्गानेच जात असतो की जिथे मनुष्याला शोक करण्याची वेळ येत नाही. तो शोकरहित होतो.

४. माझी ही शेती अमृतफलदायिनी आहे. अशी शेती करून मनुष्य सर्व दुःखांतून मुक्त होतो.

१-४. सु.नि. (कसिभारद्वाजसुत्त)



# अनात्मा

१. रूप, वेदना, संज्ञा, संस्कार, विज्ञान अनित्य आहेत; क्षणभंगुर आहेत, दु:ख देणारे आहेत तेव्हा ते आत्मा होऊ शकत नाहीत.

२. रूप, वेदना, संज्ञा, संस्कार व विज्ञान या पंचस्कंधांनाच आत्मा समजणे चुकीचे आहे; कारण हे पंचस्कंध बाधाग्रस्त, रोगाधीन आहेत.

३. रूप, वेदना, संज्ञा, संस्कार, विज्ञान आत्मा नाहीत. तेव्हा त्यांच्यापासून विरक्त झाले पाहिजे आणि अशा वैराग्यातून विमुक्तीचा अनुभव घेऊन कृतकृत्य झाले पाहिजे.

१-३. वि.पि. (अनत्त-लक्खणसुत्त)



# अनित्यता

१. हाड व स्नायू यांनी युक्त, त्वचा व मांस यांनी लिंपलेले, असे हे जे शरीर आहे तसे ते दिसत नाही.

२. या शरीरामध्ये आतडे, उदर, यकृत, बस्ती, हृदय, फुफ्फुस, शेंबूड, लाळ, घाम, मेद, रक्त, कफ, पित्त, चरबी इत्यादी भरलेले आहे.

३. त्याच्या नऊ दारांतून सतत घाण बाहेर पडत असते. डोळ्यांतून अश्रू व कानांतून मळ स्रवत असतो.

४. असा हा अमंगल द्रव्यांनी भरलेला देह मरण पावला की त्याला स्मशानात कुत्री, कोल्हे, लांडगे, किडे, कावळे, गिधाडे फाडून खाऊन टाकतात.

५. अपवित्र व नाना दुर्गंधींनी परिपूर्ण भरलेले हे द्विपाद शरीर आतील दुर्गंध बाहेर टाकीत असते आणि ही सर्व घाण एका एका मार्गाने बाहेर पडते.

६. अशा प्रकारच्या शरीराने युक्त असा जो कोणी स्वत:ला उच्च व दुसऱ्याला नीच समजतो, त्याला त्या अविद्येशिवाय दुसरे काय कारण आहे?

७. अरे, हे तुच्छ शरीर लवकरच अचेतन होऊन लाकडाच्या ओंडक्यासारखे जमिनीवर निरर्थक पडून राहील.

८. हे विचित्र शरीर पाहा, जे रोगग्रस्त, फुगलेले व व्याकूळ तसेच अनेक संकल्पांनी युक्त असून ज्याची स्थिती अनित्य आहे.

९. रूप अनित्य आहे, वेदना अनित्य आहेत, संज्ञा अनित्य आहेत, संस्कार अनित्य आहेत व विज्ञान अनित्य आहे.

१०. सर्व धर्म (मनोव्यापार) अनात्म आहेत, हे जेव्हा माणसाला आपल्या प्रज्ञेने समजते तेव्हा तो दुःखापासून निर्वेद पावतो. हाच विशुद्धीचा मार्ग आहे.

१-६. सु.नि. (विजयसुत्त); ७. ध.प. (चित्तवग्गो), ८. (जरावग्गो);
९. सं.नि. (खरसंयुत्त); १०-११. ध.प. (मग्गवग्गो)



# अहिंसा

१. जसा मी तसेच हे प्राणी आहेत. ते प्राणी जसे आहेत त्याप्रमाणे मी आहे. सर्व आपणासारखेच समजून कोणाची हिंसा करू नये.

२. जेव्हा मन हिंसेपासून परावृत्त होते तेव्हा दु:खही आपोआप शांत होते.

३. प्राण्याचा वध करू नये. चोरी करू नये. असत्य भाषण बोलू नये. मादक पदार्थांचे सेवन करू नये. मैथुनापासून विरक्त राहावे व रात्री उशिरा भोजन करू नये.

४. जशी माता, जसा पिता, जसा भाऊ व जसे इतर बांधव, तशी गायदेखील आमची परममित्र आहे, जिच्यापासून औषधे प्राप्त होतात.

५. अशी ही गाय आम्हाला अन्न देणारी आहे. बल देणारी आहे. सुख देणारी आहे. या गोष्टी जाणून प्राचीन काळी ब्राह्मण गाईचा वध करीत नसत.

६. जो हिंसा न करणारा व आत्मसंयमी आहे, तो अच्युतपदाला जाऊन पोहोचतो. तिथे गेल्यावर त्याला शोक नसतो.

१. सु.नि. (नालकसुत्त); २. ध.प. (ब्राह्मणवग्गो); ३. सु.नि. (धम्मिकसुत्त), ४-५ (ब्राह्मणधम्मिकसुत्त); ६. ध.प. (कोधवग्गो)



# सत्य

१. असत्यामध्ये जे सत्य पाहतात आणि सत्यामध्ये असत्यं पाहतात त्यांना सत्य कधीच गवसत नाही, ते नेहमी मिथ्या संकल्पांच्यामागे धावत राहतात.

२. पण जे सत्याला सत्य समजतात आणि असत्याला असत्य किंवा जे साराला सार समजतात आणि असाराला असार, ते सत्य ओळखतात आणि योग्य संकल्पांच्या मागे लागतात.

३. असत्यवादी नरकात जातात आणि करून मी केले नाही असे म्हणणारेसुद्धा नरकात जातात.

४. सभेत किंवा परिषदेत असताना किंवा दुसऱ्याशी बोलत असताना खोटे कधी बोलू नये; दुसऱ्याकडून बोलवू नये आणि खोटे बोलणाऱ्याला संमती देऊ नये. सर्व प्रकारच्या असत्याचा त्याग करावा.

५. सत्य एकच आहे, दुसरे नाही. त्याविषयी समंजस लोक आपापसात वाद घालत नाहीत.

६. जो मुनी सत्याला धरून आणि असत्याला सोडून संसारसागराच्या तीरावर येतो, त्या सत्यनिष्ठ मुनीलाच शांत म्हटले जाते.

७. सत्यवचन ही खरोखर अमृतवाणीच आहे, हा सनातन धर्म आहे. सत्य, अर्थ व धर्म यांत प्रतिष्ठित असलेल्या संतांचे हे अमृतबोल आहेत.

१-२. ध.प. (यमकवग्गो), ३. (निरयवग्गो); ४. सु.नि. (धम्मिकसुत्त); ५. (चुळवियूहसुत्त); ६. (अत्तदण्डसुत्त); ७. (सुभासितसुत्त).



124284



# ब्रह्मविहार

१. मैत्री, करुणा, मुदिता आणि उपेक्षा या चार मनोवृत्तींना ब्रह्मविहार म्हणतात.

२. सद्धम्मात प्रतिष्ठित भिक्षू मैत्रीयुक्त अंत:करणाने, करुणायुक्त अंत:करणाने, मुदितायुक्त अंत:करणाने, उपेक्षायुक्त अंत:करणाने एक दिशा, त्याच क्रमाने दुसरी, तिसरी, चौथी दिशा भरून टाकतो; याप्रमाणे वर, खाली, आजूबाजूला, सर्वत्र सर्व जग विपुल, अप्रमाण, निर्वैर, द्वेषरहित अशा अंत:करणाने भरून टाकतो. याप्रमाणे तो भिक्षू ब्रह्मप्राप्त होतो.

३. मैत्री या चित्तविमुक्तीची गोडी धरली, भावना केली, अभिवृद्धी केली, ती मार्गाला लावली, तिची स्थापना केली, तिचे अनुष्ठान केले, तिचा परिचय केला, उत्साहाने तिचा अंगीकार केला तर अकरा फायदे होतात. तो मनुष्य सुखाने निजतो, सुखाने उठतो, दुष्ट स्वप्न पाहत नाही, इतरांना प्रिय होतो, भूतपिशाचांना प्रिय होतो, देवता त्याचे रक्षण करतात, विष किंवा शस्त्र यांची त्याला बाधा होत नाही, त्वरित चित्ताचे समाधान होते, मुखकांती प्रसन्न होते, शांतपणे मरण येते, निर्वाण प्राप्त झाले नाही तरी निदान मरणोत्तर ब्रह्मलोकाला जातो.

४. मनुष्याने लहानपणापासूनच मैत्री, करुणा, मुदिता आणि उपेक्षा भावनेने चित्त-विमुक्तीचा अभ्यास केला तर त्याच्याकडून पापकर्म घडेलच कसे? आणि त्याने पापकर्म केले नाही की त्याला दु:ख भोगण्याची वेळच येणार नाही.

५. स्त्री-पुरुष सर्वांनी ही मैत्री, करुणा, मुदिता व उपेक्षा या चित्तविमुक्तींची भावना केली पाहिजे.

१-२. अं.नि. (चतुक्क निपात), ३. (मेत्तसुत्त),
४-५. (करजकायसुत्त)



# मैत्रीभावना

१. शांतपद प्राप्त करू इच्छिणाऱ्या आत्महितदक्ष माणसाचे हे कर्तव्य आहे की त्याने सहनशील, सरळात सरळ, मधुरभाषी, मृदू आणि निगर्वी व्हावे.

२. सुज्ञजन दोष देतील असे क्षुद्र आचरण त्याने करू नये. जगातील सर्व प्राणी सुखी, आनंदित होवोत अशीच भावना त्याने करावी.

३. आई जशी आपला जीव पणाला लावून आपल्या मुलाचे रक्षण करते, तशी सर्व प्राण्यांविषयी अमर्याद मित्रत्वाची प्रेमभावना त्याने मनात बाळगावी.

४. सर्व लोकांविषयी वर, खाली, चहू बाजूंना निर्वैर अशी मैत्री भावना त्याने निरंतर वाढवीत न्यावी.

५. उठता-बसताना, चालता-बोलताना सतत जागरूक राहून ही मैत्रीभावना त्याने कायम ठेवावी.

१-५. सु.नि. (मेत्तसुत्त)



# मन

१. मन हे सर्व प्रवृत्तींच्या, विचारांच्या अग्रभागी असते. सर्व मनोधर्म मनापासूनच उत्पन्न होतात. जो दुष्ट मनाने बोलतो, वागतो, कर्म करतो, त्याच्या मागे दु:ख लागते, जसे गाडीच्या बैलामागून चाक येते.

२. माणसाच्या स्वभावधर्मावर, विचारांवर मनाचे प्रभुत्व असते. सर्व मनोधर्म मनातूनच उत्पन्न होतात. जो प्रसन्न मनाने बोलतो, वागतो, कर्म करतो, त्याच्या मागे त्याच्या सावलीप्रमाणे सुख येते.

३. ज्याचे अंत:करण स्वच्छ नाही, जो मनाने निर्मळ नाही, रागद्वेषादी मनोविकारांपासून जो मुक्त नाही, अशा माणसाने जरी भगवी वस्त्रे अंगावर घातली, तरी तो ती घालण्यास लायक नसतो.

४. नीट न शाकारलेल्या घरात जसे पावसाचे पाणी शिरते त्याप्रमाणे संस्कारहीन मनात विकार, वाईट विचार शिरतात.

५. नीट शाकारलेल्या घरात जसे पावसाचे पाणी शिरत नाही त्याप्रमाणे संस्कारशील मनात विकार, वाईट विचार शिरत नाहीत.

६. बाण करणारा जसा बाण तासून सरळ करतो, त्याप्रमाणे ज्ञानी माणूस चंचल, अस्थिर मनाला सरळ करतो. त्याच्यावर नियंत्रण ठेवतो.

७. चंचल मन ताब्यात ठेवणे अवघड असते. बेतालपणे भरकटणाऱ्या मनावर जो नियंत्रण ठेवू शकतो म्हणजेच मन आपल्या ताब्यात ठेवू शकतो तोच नेहमी सुखी होतो.

८. भरकटणाऱ्या मनाला ज्ञानी पुरुषाने स्थिर करावे. त्याचे रक्षण करावे. कारण स्थिर चित्तच सुखदायक होते.

९. ज्याचे मन विचलित होत नाही, ज्याच्या मनाचा प्रक्षोभ होत नाही, जो

पाप-पुण्य ह्यांचा विचार करीत नाही, अशा जागृत माणसाला कसलीच भीती वाटत नाही.

१०. शत्रू शत्रूची किंवा वैरी वैऱ्याची जेवढी हानी करू शकेल, त्यापेक्षाही अधिक हानी चुकीच्या मार्गाला लागलेले मन करू शकते.

११. आई-वडील अथवा इतर नातेवाईक जेवढे आपले कल्याण करू शकतील, त्यापेक्षा अधिक कल्याण सन्मार्गी लागलेले आपले मन करू शकते.

१-५. ध.प. (यमकवग्गो), ६-११. (चित्तवग्गो)



# तृष्णा

१. अविचारी माणसाची तृष्णा वेलीप्रमाणे सारखी वाढतच जाते. अरण्यात फळे खाण्याच्या लालसेने वानर जसा एका झाडावरून दुसऱ्या झाडावर उड्या मारत राहतो, तसा तृष्णामूढ मनुष्य एका वस्तूकडून दुसऱ्या वस्तूकडे भटकत राहतो.

२. ही विषारी, भयंकर तृष्णा ज्याला वश करते त्याची दु:खे पावसाळ्यात वाढणाऱ्या गवताप्रमाणे वाढतच जातात.

३. दमन करायला अवघड अशा या तृष्णेवर जो विजय मिळवतो त्याची दु:खे कमळाच्या पानांवरून पाण्याचे थेंब गळून पडावेत तशी गळून पडतात.

४. समूळ नष्ट न करता झाडाच्या फांद्याच नुसत्या छाटल्या तर झाड जसे पुन्हा वाढते, त्याप्रमाणे तृष्णेची पाळेमुळे कापून टाकली नाहीत तर दु:ख पुन्हा पुन्हा उद्भवत राहते.

५. तृष्णेचे प्रवाह सगळीकडे वाहतच असतात. त्यातून वासनेच्या लता उगवतात. या विषय-वासनांच्या वेलींची मुळे प्रज्ञेने कापून टाकणेच हिताचे असते.

६. सुखलोलुप लोक तृष्णेच्या प्रवाहात अडकतात आणि जन्म-मरणाच्या चक्रात फिरत राहतात.

७. जाळ्यात सापडलेल्या सशाप्रमाणे तृष्णाबंधनात अडकलेले लोक पुन्हा पुन्हा दु:खे भोगीत राहतात.

८. ज्ञानी लोक लोखंडी साखळीला किंवा दोरखंडाला बळकट बंधन समजत नाहीत. कारण यांच्यापेक्षाही मोठे बंधन हिरेमाणके, दागदागिने, बायको-मुले इत्यादींविषयीची आसक्ती हेच असते.

९. विकाराधीन लोक स्वत: विणलेल्या जाळ्यात कोळी अडकतो तसे विषयभोगांच्या प्रवाहात वाहत जातात. पण निर्भय, निश्चयी पुरुष या प्रवाहाला छेदून सर्व दु:खांपासून मुक्त होऊन निरिच्छ होतात.

१०. जे विचारहीन झाले आहेत, ज्यांचे विकार तीव्र झाले आहेत, जे सुखाच्या मागे लागले आहेत, त्यांची तृष्णा वाढतच जाते. असे अज्ञ लोक आपली बंधने सैल करण्याऐवजी आणखी बळकट करीत असतात.

११. जो निष्पाप झाला आहे, ज्याची तृष्णा नष्ट झाली आहे, जो दु:खमुक्त झाला आहे, अशाचे सर्व भवपाश तुटल्यामुळे त्याचा हा अंतिम देह आहे. जन्म-मरणाच्या फेऱ्यातून त्याची सुटका झाली आहे.

१२. धर्मदान हे इतर सर्व दानांहून श्रेष्ठ दान आहे; धर्मरस हा इतर सर्व रसांहून श्रेष्ठ रस आहे; धर्मासक्ती ही इतर सर्व आसक्तींपेक्षा श्रेष्ठ आसक्ती आहे आणि तृष्णेचा क्षय हा सर्व दु:खांना जिंकणारा आहे.

१३. तृण शेतीला दूषित करतात आणि विकार माणसाला दूषित करतात. म्हणून विकारांपासून मुक्त झालेल्याला केलेले दान फलदायक होते.

१४. बुद्धिहीन मनुष्याला त्याचे विषयभोगच नष्ट करतात. विषयभोगांच्या तृष्णेत मग्न असलेला पुरुष आत्मघातकी बनून स्वत:चाच नाश करून घेतो.

१-१४. ध.प. (तण्हावग्गो)



# क्रोध

१. उसळलेल्या क्रोधाला जो उधळलेल्या रथाप्रमाणे थोपवून धरतो त्यालाच मी खरा सारथी म्हणतो. ज्यांना हे जमत नाही ते नुसते लगाम धरणारेच असतात.

२. अक्रोधाने क्रोध जिंकावा. वाईटाला चांगल्याने जिंकावे. कंजुषाला उदारतेने जिंकावे आणि खोटे बोलणाऱ्याला सत्याने जिंकावे.

३. नेहमी खरे बोलावे. रागावू नये. याचकाला विन्मुख करू नये. या तीन गोष्टी केल्याने मनुष्य देवाजवळ जातो.

४. अमक्याने मला शिव्या दिल्या. अमक्याने मला मारले. अमक्याने मला हरवले. अमक्याने मला लुबाडले, असा विचार जे सारखा करीत बसतात त्यांचे वैर कधी संपतच नाही.

५. अमक्याने मला शिव्या दिल्या. अमक्याने मला मारले. अमक्याने मला हरवले. अमक्याने मला लुबाडले, असा विचार जे करीत बसत नाहीत त्यांचे वैर लगेच शांत होते.

६. वैराने वैर कधीच संपत नाही. अवैराने, प्रेमभावाने, मैत्रीनेच ते शमन पावते, शांत होते. हा सनातन धर्म आहे. हे त्रिकालाबाधित सत्य आहे.

७. तुम्हाला कोणी शिवी दिली, गालावर थप्पड मारली, दगडाने मारले किंवा अगदी तुमच्यावर कोणी शस्त्रप्रहार केला तरी तुमच्या मनात विकार येता कामा नये. तुमच्या तोंडून अपशब्द निघता कामा नयेत. शत्रूविषयीसुद्धा तुमच्या मनात अनुकंपा, मैत्रीच असली पाहिजे. क्रोध असता कामा नये.

८. मनुष्य तोपर्यंतच शांत, नम्र असतो जोपर्यंत कोणी त्याला अपशब्द बोलत नाही. परंतु जेव्हा त्याच्यावर अपशब्द किंवा निंदा ऐकण्याची

वेळ येते तेव्हाच तो शांत, नम्र राहू शकतो की नाही, याची खरी परीक्षा होते.

९. एखादा मनुष्य कुदळ हातात घेऊन आवेशाने म्हणू लागला की, 'मी या महापृथ्वीचा नाश करीन.' दुसरा एखादा पिवळा, निळा रंग घेऊन आला आणि म्हणू लागला की, 'मी या आकाशालाच रंगवून टाकीन.' किंवा तिसरा एखादा हातात मशाल घेऊन म्हणू लागला की, 'मी या गंगा नदीलाच जाळून टाकीन.' तर त्यांचे ते प्रयत्न व्यर्थच जाणार हे उघड आहे. पृथ्वी, आकाश, गंगा नदीवर त्यांचा किंचितही परिणाम होणार नाही. तसा दुसऱ्यांच्या कटू बोलण्याचा तुमच्या मनावर कुठलाही वाईट परिणाम होता कामा नये.

१०. सर्व लोकांसाठी तुमच्या मनात हितानुकंपा आणि मैत्री असू द्या. लुटारू जरी करवतीने तुमचे अवयव कापू लागला आणि त्या वेळी जर तुमच्या मनात क्रोध उत्पन्न झाला तर तुम्ही माझे शिष्य नाही असेच मी समजेन. अशा वेळीसुद्धा भिक्खूंनो, असे शिकले पाहिजे की, 'मी माझ्या चित्ताला विपुल, विशाल, अमर्यादित मैत्रीपूर्ण अवैराने, अद्वेषाने साऱ्या विश्वाला व्यापून विहार करीन.'

१-३. ध.प. (कोधवग्गो), ४-७ (यमकवग्गो),
७-१० म.नि. (ककचूपमसुत्तन्त)



# सुख

१. बुद्धांचा जन्म सुखदायक असतो, सद्धर्माचा उपदेश सुखदायक असतो, संघातील एकोपा सुखकारक असतो, तसेच तपाचरण हेही सुखकारक असते.

२. विजय द्वेष उत्पन्न करतो. पराजित दु:खी होतो. जय-पराजयाच्या पलीकडे गेलेला शांत पुरुष सुखाने झोपतो.

३. वासनेसारखा अग्नी नाही. द्वेषासारखा कली नाही. ऐहिक अस्तित्वासारखे दु:ख नाही व शांतीसारखे सुख नाही.

४. आपले शरीर दु:खदायक आहे हे ज्याला कळते, त्याला निर्वाण हे परमसुखासारखे वाटते.

५. आरोग्य ही सर्वात मोठी देणगी आहे. संतोष हे सर्वात मोठे धन आहे. विश्वास हा सर्वात मोठा मित्र आहे आणि निर्वाण हे सर्वश्रेष्ठ सुख आहे.

ध.प. (सुखवग्गो)



# गृहस्थधर्म

१. ज्या गृहस्थाला सहा दिशांची पूजा करायची आहे त्याने चार कर्मक्लेशांचा त्याग केला पाहिजे. चार कारणांसाठी त्याने पापकर्म करता कामा नये शिवाय सहा संपत्तिनाशाचे दरवाजे त्याने बंद केले पाहिजेत. या चौदा गोष्टींचा त्याग करून जे सहा दिशांची पूजा करतात त्यांनाच इहपरलोक मिळतात.

२. चार कर्मक्लेश कोणते? हिंसा, चोरी, व्यभिचार आणि खोटे बोलणे हे चार कर्मक्लेश आहेत. गृहस्थाने त्यांच्यापासून नेहमी दूर राहिले पाहिजे.

३. कुठल्या चार कारणांसाठी मूढ मनुष्य पापकर्म करण्यास उद्युक्त होतो? स्वेच्छाचार, द्वेष, मोह आणि भय या चार कारणास्तव अज्ञ मनुष्य पापकर्म करतो. त्यामुळे त्याचे यश कृष्ण पक्षातील चंद्राप्रमाणे नाश पावते.

४. जो गृहस्थ स्वेच्छाचार, द्वेष, मोह व भय यांच्यामुळे धर्माचे अतिक्रमण करीत नाही, त्याचे यश शुक्ल पक्षातील चंद्राप्रमाणे वाढत जाते.

५. आता संपत्तिनाशाची सहा द्वारे कोणती ते सांगतो : १) मद्यपान, २) अवेळी बाहेर भटकणे, ३) नाच-तमाशा पाहण्याचे व्यसन, ४) जुगार खेळणे, ५) दुष्टांची संगती व ६) आळस. ही सहा संपत्तिनाशाची दारे त्याने कायमची बंद करावीत.

६. धनाचा नाश करणारी, कलह वाढवणारी, रोगाचे माहेरघर, मानहानीची आई, लज्जेचा विध्वंस करणारी व प्रज्ञेला दुर्बळ करणारी अशी ही सुरा आहे. या वारुणीच्या नादाला जो लागला तो लवकरच आपला नाश करून घेतो.

७. अवेळी बाहेर हिंडण्याची ज्याला सवय लागते तो स्वत:चे, मुलाबाळांचे संरक्षण करू शकत नाही. संपत्तीचे रक्षण त्याच्याकडून होत नाही. तो रात्रंदिवस साशंक असतो; खोटे बोलण्याची त्याला सवय लागते,

पुष्कळशी संकटे तो आपल्यावर ओढवून घेतो.

८. नाच-तमाशाचे ज्याला व्यसन लागते तो रात्रंदिवस त्यातच मश्गूल होतो आणि संसाराकडे लक्ष द्यायला त्याला सवड मिळत नाही. त्यामुळे घराकडे त्याचे दुर्लक्ष होते.

९. जुगारात पैसा मिळाला तर त्या पैशाबरोबरच जुगारी दुसऱ्याचे वैर संपादन करतो. जुगारात पैसा घालवला तर त्याचा तो शोक करीत बसतो. जुगाऱ्याच्या बोलण्यावर कोणी विश्वास ठेवत नाही. नातेवाईक त्याचा तिरस्कार करतात. 'हा काय बायकोला पोसणार?' असे हिणवून कोणी त्याला मुलगी द्यायलाही तयार होत नाही.

१०. दुष्ट मित्रांची ज्याला संगत घडली त्याला जुगारी, मद्यपी, चोर, ठक या सगळ्यांची क्रमाक्रमाने संगत घडते आणि असे मित्र त्याच्या नाशाला कारण होतात.

११. आळसाचे परिणामही महाभयंकर असतात. आळशी मनुष्य 'आज फार थंडी आहे' म्हणून काम करीत नाही; 'आज फार ऊन आहे' म्हणून काम करीत नाही; 'आज फार थकवा आलाय' म्हणून काम करीत नाही. अशा प्रकारे सगळा त्याचा वेळ आळसात गेल्यामुळे धनप्राप्ती तर होत नाहीच, असलेले धनही नाश पावते. आळशी मनुष्याला वडिलोपार्जित संपत्तीही सोडून जाते.

१२. घरी आल्यावर काही ना काही घेऊन जाणारा, शब्दांनीच उपकार करू पाहणारा, हांजी हांजी करणारा व पापकर्मात साहाय्य करणारा, हे चार आपले हितशत्रू आहेत असे समजावे आणि त्यांचा बिकट मार्गाप्रमाणे दुरूनच त्याग करावा.

१३. उपकार करणारा, दु:खाने दु:खी व सुखाने सुखी होणारा, सदुपदेश करणारा तसेच अनुकंपा करणारा, हे चार आपले खरे मित्र आहेत असे समजावे आणि आई जशी आपल्या मुलाची जोपासना करते तशी या मित्रांची जोपासना करावी.

१४. गृहस्थाने ज्या सहा दिशांची पूजा करायची त्या सहा दिशा कोणत्या ते सांगतो. आईवडिलांना पूर्व दिशा समजावे; गुरूला दक्षिण दिशा समजावे; पत्नीला पश्चिम दिशा समजावे; आप्तमित्रांना उत्तर दिशा समजावे; सेवकांना खालची दिशा समजावे आणि साधुसंतांना वरची दिशा समजावे.

१५. पूर्व दिशा जे आईवडील त्यांची पाच गोष्टींनी पूजा करावी : १) त्यांचे

काम करावे, २) त्यांचे पोषण करावे, ३) कुळात चालत आलेली सत्कार्ये चालू ठेवावी, ४) त्यांच्या वचनात वागून त्यांच्या संपत्तीचे वाटेकरी व्हावे आणि ५) दिवंगत आईवडिलांच्या नावे दानधर्म करावा. या पाच गोष्टींनी आईवडिलांची पूजा केली तर ते पाच प्रकारांनी मुलांवर अनुग्रह करतात : १) पापापासून त्यांचे निवारण करतात, २) कल्याणकारक मार्गावर त्यांना घेऊन जातात, ३) कलाकौशल्य शिकवतात, ४) योग्य स्त्रीशी लग्न करून देतात व ५) योग्य वेळी आपली मिळकत त्यांच्या स्वाधीन करतात.

१६. दक्षिण दिशा जे गुरू त्यांची शिष्याने पाच गोष्टींनी पूजा करावी : १) गुरू जवळ येताच उठून उभे रहावे, २) ते आजारी असतील तेव्हा त्यांची सेवा करावी, ३) श्रद्धापूर्वक ते शिकवतील ते आत्मसात करावे, ४) त्यांचे काही काम असल्यास ते करावे, ५) त्यांनी दिलेली विद्या उत्तम रीतीने ग्रहण करावी. या पाच गोष्टींनी गुरूंची पूजा केली, तर ते पाच प्रकारांनी शिष्यांवर अनुग्रह करतात : १) सदाचाराचे शिक्षण देतात, २) सर्व विद्यांचे ज्ञान त्यांना करून देतात, ३) त्यांना जेवढे ज्ञान आहे ते सगळे शिष्यांना देतात, ४) आपल्या आप्तमित्रांत त्यांची स्तुती करतात व ५) त्यांच्या उदरनिर्वाहाला अडचण येऊं नये, अशी विद्या शिकवतात.

१७. पश्चिम दिशा जी पत्नी तिची पाच गोष्टींनी पूजा करावी : १) तिला मान द्यावा, २) कोणत्याही तऱ्हेने तिचा अपमान होऊ देऊ नये, ३) अन्य स्त्रीशी संबंध ठेवू नये (एकपत्नीव्रताचे आचरण करावे), ४) घरचा कारभार तिच्यावर सोपवावा व ५) वस्त्रप्रावरणाची तिला कमतरता पडू देऊ नये. या पाच गोष्टींनी पत्नीची पूजा केली तर ती पतीला पाच प्रकारांनी उपकारक होते : १) घरात उत्तम व्यवस्था ठेवते, २) नोकरचाकरांना प्रेमाने सांभाळते, ३) पतिव्रता होते, ४) पतीने मिळवलेल्या संपत्तीचे रक्षण करते (हात राखून खर्च करते) व ५) सगळ्या गृहकृत्यात उद्योगी आणि दक्ष राहते. याप्रमाणे जर पतीने पश्चिम दिशा जी भार्या तिची पूजा केली तर ती त्याला सुखावह होते.

१८. गृहस्थाने उत्तर दिशा जे आप्तमित्र त्यांची पाच गोष्टींनी पूजा करावी : १) त्यांना देण्यासारख्या असतील त्या वस्तू द्याव्यात, २) त्यांच्याशी प्रिय संभाषण करावे, ३) त्यांच्या उपयोगी पडावे, ४) समानभावाने त्यांच्याशी वर्तन करावे ५) त्यांच्याशी निष्कपट व्यवहार करावा. या

पाच गोष्टींनी जर गृहस्थाने उत्तर दिशा जे आप्तमित्र यांची पूजा केली तर ते गृहस्थास पाच प्रकारांनी उपकारक होतात : १) संकटकाळी, प्रतिकूल परिस्थितीत त्याचे रक्षण करतात, २) संकटकाळात त्याच्या संपत्तीचेही रक्षण करतात, ३) संकटाने घाबरून गेल्यावर त्याला धीर देतात, ४) विपत्तीतही ते त्याला सोडत नाहीत आणि ५) त्याच्या मुलाबाळांनाही ते उपकृत करतात. अशा प्रकारे उत्तर दिशा गृहस्थाला कल्याणकारक होते.

१९. पाच गोष्टींनी धन्याने खालची दिशा जे सेवक त्यांची पूजा करावी : १) त्यांच्या योग्यतेप्रमाणे त्यांना काम सांगावे, २) त्यांना योग्य वेतन द्यावे, ३) ते आजारी पडले तर त्यांची शुश्रूषा करावी, ४) वारंवार त्यांना उत्तम भोजन द्यावे आणि ५) उत्तम कामाकरिता त्यांना बक्षीस द्यावे. या पाच गोष्टींनी खालची दिशा जे सेवक त्यांची जर धन्याने पूजा केली, तर ते पाच प्रकारांनी त्याला उपकारक होतात : १) धनी उठण्यापूर्वी ते उठतात, २) धनी निजल्यावर निजतात, ३) धन्याच्या संपत्तीची चोरी करीत नाहीत, ४) उत्तम तऱ्हेने काम करतात आणि ५) सर्वत्र धन्याची कीर्ती पसरवितात. याप्रमाणे केलेली खालच्या दिशेची पूजा सुखावह होते.

२०. पाच गोष्टींनी गृहस्थाने वरची दिशा जे साधु-संत त्यांची पूजा करावी : १) देहाने त्यांचा आदर करावा, २) वाचेने आदर करावा, ३) मनाने आदर करावा, ४) त्यांना गरज असेल ते द्यावे आणि ५) भिक्षेला आले तर त्यांना अडवू नये. या पाच गोष्टींनी जर गृहस्थाने त्यांची पूजा केली तर ते त्याला पाच प्रकारांनी उपकारक होतात : १) पापापासून त्याचे निवारण करतात, २) त्याला कल्याणकारक मार्गाला लावतात, ३) प्रेमपूर्वक त्याच्यावर अनुग्रह करतात, ४) उत्तम धर्म शिकवतात आणि ५) शंकानिवारण करून त्याच्या मनाचे समाधान करतात. याप्रमाणे केलेली वरच्या दिशेची पूजा गृहस्थाला हितावह होते.

२१. दान, प्रिय संभाषण, अर्थचर्या म्हणजे उपयोगी पडणे आणि समानात्मता (दुसऱ्याला आपल्यासारखे समजणे) ही चार लोकसंग्रहाची साधने आहेत. बुद्धिमान गृहस्थ या चार साधनांच्या द्वारे जगात उच्चपद प्राप्त करून घेतो.

१-२१ दी.नि. (सिंगालोवादसुत्त)



# कर्म

१. जे कर्म केल्याने मनुष्यावर पश्चात्ताप करण्याची पाळी येते व ज्याचा शेवट अश्रू ढाळून रडण्यात होतो ते कर्म चांगले नाही.

२. जे कर्म केल्याने मनुष्याला पश्चात्ताप होत नाही व ज्याचा शेवट मनाच्या प्रसन्नतेत होतो ते कर्म चांगले.

३. वाईट काम करणे जसे सोपे आहे तसेच आपले अहित करणे सोपे आहे. हितकर व चांगले कर्म करणेच अवघड आहे.

४. जन्माने कोणी ब्राह्मण होत नाही आणि जन्माने कोणी शूद्र होत नाही. कर्मानेच ब्राह्मण होतो आणि कर्मानेच शूद्र होतो.

५. कर्माने चोर होतो. कर्माने योद्धा होतो. कर्माने याचक होतो आणि कर्मानेच राजाही होतो.

६. कर्मफलाला जाणणारे ज्ञानी कारणामुळे उत्पन्न होणाऱ्या प्रतीत्यसमुत्पाद तत्त्वप्रणालीला यथार्थपणे जाणून असतात.

७. सगळे लोक कर्मानेच चालणारे आहेत. प्रजा झाली तरी कर्मानेच चालते. रथाचे चाक जसे अणीला बांधले जाते त्याप्रमाणे प्राणी हे कर्माने बांधले गेले आहेत.

१-२. ध.प. (बालवग्गो), ३. (अत्तवग्गो),
४-६. सु.नि. (वासेट्ठसुत्त), ७. (नाळकसुत्त)



# पाप-पुण्य

१. पुण्य करण्यात मनुष्याने त्वरा करावी; पापापासून मनाला परावृत्त करावे. पुण्य करण्यात त्याने ढिलाई केली तर त्याचे मन पापात रममाण होते.

२. एखाद्याने पाप केले, तरी त्याने ते पुन्हा पुन्हा करू नये. पापकर्माची इच्छा त्याने बाळगू नये. कारण पापाचा संचय दु:खाला कारणीभूत होतो.

३. एखाद्याने पुण्य केले तर ते त्याने पुन्हा पुन्हा करावे. त्याचाच स्वत:ला छंद लावावा. कारण पुण्याच्या संचयाने सुख लाभते.

४. पापकर्माचे फळ प्रत्यक्ष दिसत नाही, तोपर्यंत पापी माणसाला पाप चांगलेच वाटते. पण पापाचे फळ जेव्हा प्रत्यक्ष पुढे उभे राहते तेव्हा पाप हे किती वाईट आहे हे त्याला कळते.

५. 'पापकर्माचे फळ मला कधी स्पर्श करणार नाही' असे म्हणून पापाकडे डोळेझाक करू नये. थेंब थेंब पाण्याने जसे मडके भरते तसे थोडे थोडे पाप करून मूर्ख माणूस आपल्या पापाचा घडा भरतो.

६. 'ते माझ्याकडे येणार नाही' असे म्हणून पुण्याला दूर लोटू नये. थेंब थेंब पाण्याने जसे मडके भरते त्याप्रमाणे ज्ञानी माणूस थोडे थोडे करून पुण्याचा संचय करतो.

७. आकाशात काय, समुद्रात काय, किंवा पर्वतगुहेत काय, जगात असे कोणतेही स्थान नाही की जिथे राहून पापी मनुष्य आपल्या पापकर्माच्या फळापासून आपली सुटका करून घेऊ शकेल.

८. आपण केलेले पाप आपल्यातूनच जन्म घेते, आपल्यातूनच उत्पन्न होते. हिरा जसा तो ज्या दगडात उत्पन्न झाला त्या दगडालाच फोडून बाहेर येतो तसे हे पाप पापी माणसालाच चिरडून टाकते.

९. आपण केलेले पापच आपल्याला मलिन करते व आपण न केलेले पाप आपल्याला शुद्ध राखते. शुद्धी व अशुद्धी ह्या स्वत:वरच अवलंबून असतात.

१०. जो धर्माचे उल्लंघन करतो, खोटे बोलतो, दुराचरण करतो; ज्याने परलोकाची चाड सोडली आहे, त्याने कुठले पाप करायचे बाकी ठेवले आहे?

१-७. ध.प. (पापवग्गो), ८-९. (अत्तवग्गो), १०. (लोकवग्गो).



# जागृती

१. आळसात मग्न होऊ नका. विषयभोगात नुसते रमू नका. जागरूक आणि कार्यरत पुरुषच आयुष्यात विपुल सुख प्राप्त करून घेतो.

२. जागरूक पुरुष आळशी लोकांमध्ये क्रियाशील असतो, झोपलेल्यांमध्ये जागा असतो; जसा चपळ घोडा सुस्त घोड्यांना मागे टाकून पुढे जातो तसा तो आळशी लोकांना मागे टाकून पुढे जातो.

३. जागरूकता हे अमृतपदाचे साधन आहे आणि आळस, निष्काळजीपणा हा मृत्यूकडे नेणारा मार्ग आहे. जे सतत जागरूक असतात ते मरत नाहीत आणि जे असावध असतात ते जगूनही मेल्यात जमा होतात.

४. इंद्र हा जागरूक असल्यामुळेच देवांमध्ये श्रेष्ठ झाला. कर्तव्यदक्षतेची नेहमी प्रशंसा होते आणि आळशाची नेहमी निंदाच केली जाते.

५. जो भिक्षू कर्तव्यदक्ष आहे आणि प्रमादाकडे नेहमी भयाने पाहतो, त्याचे कधी पतन होत नाही. तो निर्वाणाच्या जवळ असतो.

६. आळशी आणि निरुद्योगी असे शंभर वर्षांचे आयुष्य जगण्यापेक्षा कृतिशीलतेचे एक दिवसाचे आयुष्य जगणे श्रेयस्कर आहे.

७. जे शीलसंपन्न, विद्यासंपन्न आहेत; धर्माचारी आहेत; सत्यवादी, कर्तव्यदक्ष आहेत अशांवर लोक प्रेम करतात.

८. सतत जागृत राहून रात्रंदिवस जे योगाभ्यासात मग्न असतात; निर्वाण हेच ज्यांचे उद्दिष्ट असते त्यांचे सर्व दोष नाहीसे होतात.

९. आळस हा महारोग आहे. प्रमादामुळे हा रोग उत्पन्न होतो. उद्योग व विद्या यांच्या साहाय्याने हा शरीरात रुतून बसलेला दु:खरूपी तीर ओढून काढा व जागृत व्हा.

१-५. ध.प. (अप्पमादवग्गो), ६. (सहस्सवग्गो), ७. (पियवग्गो), ८. (कोधवग्गो), ९. सु.नि. (उट्ठानसुत्त).



# अधोगती

१. उन्नत पुरुष सरळ रीतीने जाऊ शकतो व पतनोन्मुख मनुष्यही सरळ रीतीने जाऊ शकतो. पण जो धर्मप्रेमी आहे तो उन्नतीला जातो व धर्मद्वेषी अधोगतीलाच जातो.

२. ज्याला दुर्जन प्रिय व सज्जन अप्रिय आहेत आणि जो दुर्जनाच्या मताची वाखाणणी करतो तो अधोगतीलाच जातो.

३. जो झोपाळू आहे, उद्योगहीन आहे, आळशी आहे, तामसी आहे तो अधोगतीलाच जातो.

४. जो समर्थ असूनही वृद्ध, दुबळ्या आईवडिलांचे पोषण करीत नाही तो अधोगतीलाच जातो.

५. जो ब्राह्मण, श्रमण तसेच जे इतर याचक आहेत त्यांना खोटे बोलून फसवतो तो अधोगतीलाच जातो.

६. जो आपल्या संपत्तीत इतरांना वाटेकरी करून घेत नाही व एकटाच तिचा उपभोग घेतो तो अधोगतीलाच जातो.

७. जो आपली जात, गोत्र व संपत्ती यांचा गर्व करतो व आपल्या बांधवांचा अपमान करतो तो अधोगतीलाच जातो.

८. जो अहर्निश स्त्री-सहवासात पडून राहतो, दारू पितो, जुगार खेळतो, आपली संपत्ती उधळून टाकतो तो अधोगतीलाच जातो.

९. सुविचार-संपन्न व ज्ञानी असा जो आर्य पुरुष आहे तो ही सगळी अधोगतीची कारणे नीट मनात ठसवून त्यांच्यापासून दूर राहतो व संसारात सुखाने कालक्रमणा करतो.

१-९. सु.नि. (पराभवसुत्त).



# सुभाषित वाणी

१. चार अंगांनी जी संपन्न ती सुभाषित वाणी. एखादा भिक्षू सुभाषितच बोलतो, दुर्भाषित बोलत नाही; धर्मच बोलतो, अधर्म बोलत नाही; प्रियच बोलतो, अप्रिय बोलत नाही; सत्यच बोलतो, असत्य बोलत नाही. या चार अंगांनी संपन्न ती सुभाषित वाणी.

२. संत असे म्हणतात की, सुभाषित वाणी ही उत्तम गोष्ट. धर्म बोलावा, अधर्म बोलू नये ही दुसरी उत्तम गोष्ट. प्रिय बोलावे, अप्रिय बोलू नये ही तिसरी उत्तम गोष्ट. सत्य बोलावे, असत्य बोलू नये ही चौथी उत्तम गोष्ट.

३. अशीच वाणी बोलावी की जिच्यामुळे आपल्यावर पश्चात्ताप करण्याची पाळी येत नाही व इतरांना त्रास होत नाही. तीच खरी सुभाषित वाणी.

४. निर्वाणप्राप्तीसाठी व दुःखाचा अंत करण्यासाठी जी क्षेमकारक वाणी बुद्ध बोलतो, तीच सर्वात उत्तम वाणी.

१-४. सु.नि. (सुभासितसुत्त)



# जीवन्मुक्त कोण?

१. जो संसाराचा मार्ग ओलांडून गेला आहे; जो शोकरहित आहे व सर्वथा विमुक्त झाला आहे; ज्याची सर्व बंधने नष्ट झाली आहेत अशा पुरुषाला कसल्याच यातना होत नाहीत.

२. ज्यांनी संचय केलेला नाही, ज्यांचा आहार संयमित आहे, जीवनातील क्षणभंगुरता व शून्यता यांच्या जाणिवेतून लाभणारा मोक्ष हेच ज्यांचे ध्येय आहे, अशांची गती आकाशातील पक्ष्यांच्या गतीप्रमाणे अज्ञेय असते.

३. उत्तम सारथ्याच्या घोड्याप्रमाणे ज्याची सर्व इंद्रिये शांत झाली आहेत; जो गर्वापासून, वासनांपासून मुक्त आहे, अशांचा देवदेखील हेवा करतात.

४. निर्वाणाचे खरे रूप जाणून घेऊन मुक्त झालेल्याचे मन जसे शांत होते, त्याप्रमाणे त्याची वाणी व कर्म हीसुद्धा शांत होतात.

५. जो पृथ्वीसारखा सहनशील आहे, स्तंभासारखा दृढ आहे, चिखल नसलेल्या जलाशयासारखा निर्मळ आहे, अशा पुरुषाची सर्व बंधने नष्ट झाल्याने तो जन्म-मरणाच्या फेऱ्यातून मुक्त होतो.

६. गावात किंवा अरण्यात, सखल अथवा उंच, जिथे कुठे जीवन्मुक्त (अर्हत) निवास करतात ती जागा रमणीय असते.

१-६. ध.प. (अर्हन्त्वग्गो)



# भिक्षू कोण?

१. काया-संयम चांगला, वाचा-संयम चांगला, मनाचा संयम चांगला. सर्व इंद्रियांचा संयम चांगला. सर्व बाजूंनी संयमयुक्त असलेला भिक्षू सर्व दु:खापासून मुक्त होतो.

२. जो भिक्षू आपल्या जिभेवर ताबा ठेवतो, विचारपूर्वक बोलतो, गर्वाने फुगून जात नाही, अर्थ आणि धर्म यांना प्रकट करतो, त्याचे भाषण मधुर असते.

३. धर्मात आनंद मानणारा, धर्मात रममाण होणारा, धर्माचे चिंतन करणारा आणि धर्माप्रमाणे वागणारा भिक्षू सद्धर्मापासून कधी ढळत नाही.

४. आपल्या हिताची अवहेलना करू नये, दुसऱ्यांच्या हिताचा हेवा करू नये, जो भिक्षू दुसऱ्यांच्या हिताचा हेवा करतो तो समाधी प्राप्त करू शकत नाही.

५. ज्याचा अहंकार व सर्व वस्तूंवरील आसक्ती, ममत्व नष्ट झाले आहे व आपण अकिंचन आहोत याचा शोक ज्याला होत नाही तोच खरा भिक्षू.

६. जो भिक्षू मैत्रीत रंगलेला असतो, बुद्धाच्या शिकवणीत प्रसन्न असतो तो शांतिपद प्राप्त करून घेतो.

७. हे भिक्षू! ध्यानात मग्न होऊन राहा. आळसात राहू नकोस! चित्ताला विषयभोगात भटकू देऊ नकोस. प्रमत्त होऊन तापलेल्या लोखंडाचा लाल गोळा गिळू नकोस. कारण तो जाळू लागला की हाय हाय करीत रडत बसण्याचा प्रसंग तुझ्यावर न येवो.

८. जो प्रज्ञाविहीन आहे, त्याला ध्यान साधणार नाही आणि जो ध्यानहीन आहे त्याला प्रज्ञा साधणार नाही. ज्याच्यात ध्यान व प्रज्ञा दोन्ही आहेत तोच भिक्षू निर्वाणाच्या जवळ आहे.

९. भिक्षू जसजसा पाच स्कंधांच्या (रूप, वेदना, संज्ञा, संस्कार व विज्ञान) उत्पत्ती आणि विनाशाचा विचार करतो, तसतसा तो ज्ञानमय अमृताच्या परम सुखाचा भागीदार होतो.

१०. इंद्रियांवर तावा ठेवणे, संतुष्ट असणे, प्रातिमोक्ष नियमांचे पालन करणे, शुद्धजीवी, उद्योगी मित्रांच्या संगतीत राहणे ही प्रज्ञायुक्त भिक्षूची कर्तव्ये आहेत.

११. फुलझाडांवरून जशी कोमेजलेली फुले गळून पडतात, त्याप्रमाणे हे भिक्षूंनो, तुमच्यातून राग आणि द्वेष गळून पडू द्या.

१२. शरीर व वाणीने शांत, मनाने शांत झालेल्या व सर्व आमिषे झिडकारलेल्या भिक्षूला उपशांत म्हणतात.

१३. निर्वाणपदाला जाणून जो धर्मोपदेश करतो, धर्माचे विवेचन करतो अशा शंका-निवारक भिक्षूला मार्गदर्शक भिक्षू म्हणतात.

१४. भिक्षूने आपली निंदा ऐकून विचलित होऊ नये आणि स्तुती ऐकून गर्व करू नये. त्याने लोभ, मत्सर, क्रोध, चहाडी यांचा त्याग करावा.

१-१२. ध.प. (भिक्खुवग्गो), १३. सु.नि. (चंदसुत्त),
१४. (तुवट्टकसुत्त).



# ब्राह्मण कोण?

१. ज्याच्याकडून काया, वाचा, मने पाप घडत नाही व जो या तिन्ही ठिकाणी संयमित आहे, त्याला मी ब्राह्मण म्हणतो.

२. जटाभाराने, गोत्राने वा जन्माने कोणी ब्राह्मण होत नाही. ज्याच्यात सत्य व धर्म आहे तोच पवित्र, तोच ब्राह्मण.

३. ब्राह्मण आईच्या पोटी जन्माला आला म्हणून मी कोणाला ब्राह्मण म्हणत नाही. जो श्रीमंत आहे त्याला फार तर 'महाराज' संबोधता येईल. जो अकिंचन व त्यागी आहे त्यालाच मी ब्राह्मण म्हणतो.

४. ज्याने सारी संसारबंधने तोडून टाकली आहेत, जो भयकंपित होत नाही, जो संग व आसक्तीपासून मुक्त आहे त्यालाच मी ब्राह्मण म्हणतो.

५. जो निंदा, मार व बंधन यांना निर्विकारपणे सहन करतो; जो क्षमाबलाचा सेनापती आहे त्याला मी ब्राह्मण म्हणतो.

६. जो अक्रोधी, व्रती, शीलवान, बहुश्रुत, संयमी आणि अंतिम शरीरधारी (ज्याला पुन्हा जन्म नाही) आहे त्याला मी ब्राह्मण म्हणतो.

७. कमळाच्या पानावर पाणी व आरीच्या टोकावर राई ज्याप्रमाणे राहत नाही त्याप्रमाणे जो विषयवासनेत, कामभोगात रममाण नसतो त्याला मी ब्राह्मण म्हणतो.

८. ज्याने ह्याच जन्मात आपल्या दु:ख-क्षयाचा साक्षात्कार केला आहे, ज्याने आपले ओझे फेकून दिले आहे, जो आसक्तिविरहित झाला आहे त्याला मी ब्राह्मण म्हणतो.

९. ज्याची प्रज्ञा प्रगल्भ आहे, जो बुद्धिमान आहे, जो योग्य-अयोग्य मार्ग ओळखतो व ज्याला परमार्थ प्राप्त झाला आहे त्यालाच मी ब्राह्मण म्हणतो.

१०. विरोधकांमध्ये जो अविरोधी असतो, दंडधारकांमध्ये जो दंडहीन असतो, आसक्तांमध्ये जो अनासक्त असतो त्यालाच मी ब्राह्मण म्हणतो.

११. ज्याचे बोलणे मृदू, सार्थक व सत्य असते, ज्यामुळे कोणी दुखावला जात नाही त्यालाच मी ब्राह्मण म्हणतो.

१२. इहलोक आणि परलोकाविषयी ज्याच्या सर्व आकांक्षा नष्ट झाल्या आहेत, जो आशारहित व आसक्तिरहित आहे त्यालाच मी ब्राह्मण म्हणतो.

१३. ज्याची तृष्णा नष्ट झाली आहे, जो संशयरहित झालेला आहे, ज्याने अमृतपद (निर्वाण) प्राप्त केले आहे त्यालाच मी ब्राह्मण म्हणतो.

१४. ज्याची पाप-पुण्य या दोहोंची आसक्ती नष्ट झाली आहे, जो शोकरहित, निर्मल, शुद्ध आहे त्यालाच मी ब्राह्मण म्हणतो.

१५. जो चंद्राप्रमाणे कलंकरहित, शुद्ध, शीतल आहे, तसेच ज्याची भवतृष्णा नष्ट झाली आहे त्यालाच मी ब्राह्मण म्हणतो.

१६. ज्याने मनुष्यबंधने सोडून दिव्य बंधनांनासुद्धा सोडले आहे व जो सर्व बंधनांपासून मुक्त झाला आहे त्यालाच मी ब्राह्मण म्हणतो.

१७. जो प्राण्यांची उत्पत्ती आणि लय चांगल्या तऱ्हेने जाणतो, जो नि:संग आहे, जो सद्‌गतीला पोहोचलेला आहे, जो संपूर्ण ज्ञानी आहे त्यालाच मी ब्राह्मण म्हणतो.

१८. ज्याची गती देव, गंधर्व, मनुष्य कोणीच जाणू शकत नाही, जो मलरहित आहे, जो जीवन्मुक्त आहे त्यालाच मी ब्राह्मण म्हणतो.

१९. जो निर्भय आहे, श्रेष्ठ आहे, सर्वोत्तम आहे, वीर आहे, महर्षी आहे, विजेता (जन्म-मृत्यूवर जय मिळवलेला) आहे, ज्ञानी आहे त्यालाच मी ब्राह्मण म्हणतो.

१-१९. ध.प. (ब्राह्मणवग्गो)



# चांडाळ कोण?

१. रागीट, वैर धरणारा, पापी, गुणीजनांना दोष देणारा, मिथ्यादृष्टी असणारा, मायावी अशा माणसाला वृषल म्हणजे चांडाळ समजावे.

२. जो भूतदयावादी नाही, जो प्राणिहिंसा करतो, अशा माणसाला चांडाळ समजावे.

३. जो दरोडे घालतो, लोकांना लुटतो, त्यांचे संसार उद्ध्वस्त करतो, अशा माणसाला चांडाळ समजावे.

४. जो कर्ज काढून ते परत करत नाही, उलट 'तुझे मी देणेच लागत नाही' असे म्हणून पळ काढतो, त्याला चांडाळ समजावे.

५. जो पैशांसाठी खोटे बोलतो, खोटी साक्ष देतो, अशा माणसाला चांडाळ समजावे.

६. जो व्यभिचारी आहे, वाममार्गाचे आचरण करणारा आहे, अशा माणसाला चांडाळ समजावे.

७. जो समर्थ असून आपल्या वृद्ध आई-वडिलांचे पालनपोषण करीत नाही, सेवा करीत नाही, त्याला चांडाळ समजावे.

८. जो दुसऱ्यांच्या घरी जाऊन त्यांनी केलेले आदरातिथ्य स्वीकारतो परंतु आपल्या घरी आलेल्या अतिथींचा आदरसत्कार करीत नाही, त्याला चांडाळ समजावे.

९. मोहाने वेढलेल्या, हव्यास असलेल्या लोभी माणसाला चांडाळ समजावे.

१०. जो अहंमन्यतेने पतित होऊन आत्मस्तुती आणि लोकांचा तिरस्कार करतो, त्याला चांडाळ समजावे.

१-१०. सु.नि. (वसलसुत्त)



# शहाणा कोण?

१. माळी जसा बागेत पाटातून पाणी खेळवतो, बाण करणारा बाणाला सरळ करतो, सुतार लाकडाला तासून वळण देतो, त्याप्रमाणे ज्ञानी, शहाणे पुरुष स्वत:वर नियंत्रण ठेवतात.

२. पर्वताची शिळा जशी वाऱ्याने डगमगत नाही, तसे शहाणे लोक निंदा-स्तुतीने कधीही विचलित होत नाहीत.

३. जो उपदेश देतो, सन्मार्ग दाखवतो, वाईट कर्मापासून लोकांना परावृत्त करतो असा शहाणा पुरुष सज्जनांमध्ये प्रिय होतो. दुर्जनांमध्ये मात्र अप्रिय होतो.

४. वाईट मित्रांच्या संगतीत राहू नये. अधम पुरुषांचा सहवास करू नये. सन्मित्रांच्या संगतीत राहावे. सद्‌गुणी माणसांचा सहवास करावा.

५. शहाण्या पुरुषाची सेवा केव्हाही लाभदायक असते. असा बुद्धिमान पुरुष लपलेला खजिना दाखवावा तसे लोकांचे दोष दाखवतो. अशा मेधावी पंडिताची सेवा केव्हाही कल्याणकारकच असते.

१-५. ध.प. (पण्डितवग्गो)



# मूर्ख कोण?

१. ‘पुत्र माझे, धन माझे’ असे समजून मूर्ख लोक दु:खी होतात. आपणच जर आपले नाही, तर कुणाचे पुत्र आणि कुणाचे धन?

२. जो मूर्ख आपला मूर्खपणा ओळखतो तो निदान तेवढा तरी शहाणा समजावा. पण जो मूर्ख स्वत:ला पंडित, ज्ञानी समजतो तो खरोखर मूर्खच समजावा.

३. पळीला जशी भाजीची चव कळत नाही तसा मूर्ख माणूस जन्मभर ज्ञानी पुरुषाच्या सहवासात राहिला तरी त्याला धर्म कळत नाही. जाणता, विचारी माणूस मात्र एक क्षण जरी ज्ञानी पुरुषाच्या सहवासात राहिला तरी त्याला लगेच धर्म समजतो, जशी जिभेला भाजीची चव क्षणभरात कळते.

४. जोपर्यंत केलेल्या पापाचे फळ तयार होत नाही, तोपर्यंत मूर्ख लोक त्याला मधासारखे गोड समजतात. पण जेव्हा पापाची फळे दिसू लागतात तेव्हा ते दु:खी होतात.

५. जसे ताज्या दुधाचे लगेच दही होत नाही तसे केलेले पाप तावडतोब फळाला येत नाही. राखेने झाकलेल्या अग्नीप्रमाणे ते पाप धुमसत राहते व मूर्खांचा पाठलाग करते.

१-५. ध.प. (बालवग्गो)



# मृत्यू

१. आकाशात, समुद्राच्या पोटात, पर्वत-गुहेत असे एकही स्थान नाही की जिथे राहून मनुष्य मृत्यूच्या तावडीतून सुटू शकेल.

२. मृत्यूला सर्वच भितात. आपला जीव तसाच दुसऱ्याचा जीव, हे जाणून कोणाला मारू नये.

३. ज्याप्रमाणे गुराखी काठीच्या मदतीने गुरांना कुरणाकडे नेतो त्याप्रमाणे वार्धक्य व मृत्यू माणसाचे आयुष्य ढकलत नेतात.

४. हे शरीर जीर्ण होणारे आहे. ते रोगांचे माहेरघर आहे. भंगुर आहे. अखेर ते नाश पावणारे आहे. कारण जीवनाचा अंत मरणात होतो.

५. हे शरीर म्हणजे हाडांचे नगर-किल्ला आहे. मांस आणि रक्त यांनी तो लिंपलेला आहे आणि त्यात जरा, मृत्यू, गर्व, द्वेष हे लपून बसलेले आहेत.

१-३ ध.प. (दण्डवग्गो), ४-५. (जरावग्गो)



# शोक कोणासाठी?

१. असा कुठलाच उपाय नाही जेणेकरून जन्माला आलेला मरणार नाही. ज्यांने जन्म घेतला आहे त्याला मृत्यू अटळ आहे. हा प्राण्यांचा स्वभाव आहे.

२. पिकलेल्या फळांना जसे फांदीवरून खाली पडण्याची भीती असते त्याप्रमाणे जन्मलेल्या प्रत्येकाला मृत्यूची भीती असते.

३. कुंभाराने घडवलेल्या मातीच्या भांड्याचे जसे फुटण्यात पर्यवसान होते, तसे मर्त्य जीविताचे मृत्यूत पर्यवसान होते.

४. लहान-मोठे, मूर्ख-ज्ञानी हे सगळेच मृत्यूच्या अधीन होतात. ते सर्व मृत्युपरायण आहेत.

५. मृत्यूने आणि जरेने हे जग ग्रासलेले आहे हे लक्षात घेऊन सुज्ञ शोक करीत नाहीत.

६. ज्याचा आलेला किंवा गेलेला मार्ग तुला ठाऊक नाही व ज्याचे दोन्ही अंत दिसत नाहीत अशांसाठी तू वृथा शोक कशाला करतोस?

७. कितीही रडलात, कितीही शोक केलात तरी त्याने मनाला शांती लाभत नाही. उलट दु:ख वाढून शरीरावर त्याचा विपरीत परिणामच होतो.

८. जरी मनुष्य शंभर वर्षे किंवा त्याहूनही जास्त जगला तरी शेवटी एक ना एक दिवस त्याला आप्तांना, प्रियजनांना सोडून जावेच लागणार आहे.

९. जसे पेटलेले घर पाण्याने विझवावे तसे सुज्ञ, ज्ञानी माणसाने मनात उत्पन्न झालेला शोक वारा कापसाला उडवतो तसा झट्दिशी नाहीसा करावा.

१०. प्रेमातून, मोहासक्तीतून शोक उत्पन्न होतो व प्रेमातूनच भय निर्माण होते. ज्याला प्रिय-अप्रिय काहीच नाही त्याला मग दु:ख तरी कसले आणि भय तरी कसले?

११. जो जराधर्मी आहे त्याला म्हातारपण नाही. जो मर्त्य आहे त्याला मृत्यू नाही. जो क्षयवान आहे त्याला क्षय नाही व जो नाशवंत आहे त्याला नाश नाही अशी किमया घडवणे ब्रह्माच्याही हातात नाही.

१२. हे ओळखूनच जो बुद्धिमान, विवेकी आहे तो आपल्या अंत:करणातून शोकाच्या विषाक्त बाणाला खेचून फेकून देतो. मूर्ख मनुष्य मात्र तसे न करता आपली हानी करून घेतो.

१-९ सु.नि. (सल्लसुत्त), १०. ध.प. (पियवग्गो),
११-१२. अं.नि. (कोसलसुत्त).



# निर्वाण

१. जे नेहमी धर्माप्रमाणे आचरण करतात, ते मृत्यूचे दुस्तर राज्य ओलांडून पलीकडे जातात. म्हणजेच निर्वाणाप्रत पोचतात.

२. ज्यांचे मन सम्यक् ज्ञानात चांगले तयार झाले आहे, जे अनासक्तीत आनंद मानतात, ज्यांना कसला लोभ उरलेला नाही, जे अपरिग्रहात रमलेले आहेत, जे प्रकाशमान आहेत, त्यांनी ह्या संसारात निर्वाण प्राप्त केले आहे.

३. अमरत्वाची प्राप्ती करून न घेता म्हणजेच निर्वाणाचे ज्ञान करून न घेता शंभर वर्षे जगण्यापेक्षा अमरपदयुक्त एक दिवस जगणे चांगले.

४. मनुष्य हा स्वत:चाच स्वामी आहे. त्याचा कल्याणकर्ता स्वामी दुसरा कोण असणार? स्वत:वर नियंत्रण ठेवले की तो त्या दुर्लभ स्वामीला म्हणजे निर्वाणाला प्राप्त करून घेतो.

५. सहनशीलता व क्षमाशीलता हे परम तप आहे, निर्वाण आहे असे बुद्ध सांगतात. दुसऱ्याचा घात करणारा, हिंसा करणारा संत होऊ शकत नाही त्याप्रमाणेच दुसऱ्याला दु:ख देणारा श्रमण होऊ शकत नाही.

६. तू आता पिकले पान झाला आहेस, यमदूत जवळ येऊन उभे आहेत. तू मृत्यूच्या उंबरठ्यावर उभा आहेस आणि अजून परलोकीच्या प्रवासाची शिदोरी तुझ्याजवळ तयार नाही. तेव्हा उठ आणि त्वरित उद्योगाला लाग. ज्ञानी हो. मळ धुवून काढ. दोषरहित हो. असे केल्यानेच तू दिव्य स्थानावर, निर्वाणाप्रत जाऊन पोहोचशील.

७. असे एक स्थान आहे की जिथे पृथ्वी नाही, तेज नाही व वायूही नाही. तिथे नक्षत्रे प्रकाशत नाहीत, सूर्य प्रकाशत नाही. चंद्रही प्रकाशत नाही आणि तिथे अंधकारही नाही. जेव्हा गाढ अशा समाधीत ब्राह्मणाला सत्याचे

दर्शन होते, तेव्हा तो रूप व अरूप या लोकांतामून आणि सुख:दुखातून मुक्त होतो.

८. जे निस्सित म्हणजे आश्रित आहे, तेच चलन पावते. जे अनिस्सित म्हणजे आधाररहित आहे, ते चलन पावत नाही. आणि जिथे चलन नाही, तिथेच शांतीचा वास आहे. जिथे शांती आहे, तिथे रती (आसक्ती) नाही. जिथे रती नाही तिथे आगती व गती म्हणजेच येणे-जाणे नाही, जिथे येणे-जाणे नाही, तिथे जन्म-मृत्यू नाही. तिथे हा लोकही नाही व परलोकही नाही. हाच दु:खाचा अंत होय. हेच निर्वाण.

९. ज्यामुळे मनुष्य हा संसारात बद्ध होऊन दीर्घकाल जन्म-मृत्यूच्या भवचक्रात अडकून पडतो, असा मोहासारखा दुसरा धर्म नाही. ज्यांनी या अंधकारमय मोहाचा—अज्ञानाचा—त्याग केला आहे ते पुन्हा जन्माला येत नाहीत.

१०. उच्च गतीस नेणारे व सुख देणारे असे सत्कर्मच, पुण्यकर्मच मनुष्याने करण्यास शिकावे. दान, सद्वर्तन व स्नेहभाव यांत अनुरत असावे. या तीन सद्गुणांत जो रत असतो, तो ज्ञानी दु:खरहित अशा सुखलोकात जातो.

११. महासागराचा जसा लवण रस हा एकच रस असतो तसा बुद्धांनी उपदेशिलेल्या धम्म-विनयाचाही एकच रस आहे आणि तो आहे विमुक्तिरस. विमुक्ती आणि निर्वाण एकच आहेत.

१२. ज्याप्रमाणे गंगेचे उदक व यमुनेचे उदक एकमेकांत मिसळून एकजीव होतात त्याप्रमाणे निर्वाणगामिनी प्रतिपदा (आर्य अष्टांगिक मार्ग) व निर्वाण एकमेकांत मिसळून एक होतात.

१३. या जगात दृष्ट, श्रुत, अनुमित अशा ज्या प्रिय गोष्टी आहेत त्यांची आसक्ती आणि लोभ सोडून देणे हे अच्युत निर्वाणपद आहे.

१-२. ध.प. (पण्डितवग्गो), ३. (सहस्सवग्गो), ४. (अत्तवग्गो), ५. (बुद्धवग्गो), ६. (मलवग्गो), ७. उदान (बहियसुत्त), ८. (निब्बाणसुत्त); ९. इतिवुत्तक (मोहसुत्त), १०. (झार्यासुत्त); ११. वि.पि. (चुल्लवग्गो); १२. दी.नि. (महागोविन्दसुत्त); १३. सु.नि (पारायणवग्ग).



# संकीर्ण

१. जो शीलसंपन्न, सद्‌गुणी, संयमी आहे, सत्यमार्गावर चालणारा आहे तोच भगवी वस्त्रे धारण करण्यास पात्र आहे.

२. दुराचारी माणसाने धर्मग्रंथांमधले श्लोकच्या श्लोक पाठ म्हणून दाखवले तरी संन्याशाच्या पवित्र, सदाचारपूर्ण जीवनाशी त्याचा प्रत्यक्षात काही संबंध नसतो. असा मनुष्य आयुष्यभर गुराख्यासारखा दुसऱ्याची गुरे मोजत राहतो.

३. जो सदाचारी आहे, जागरूक आहे; जो धर्माचे तंतोतंत पालन करतो, ज्याला या लोकात आणि परलोकात कशाचीच आसक्ती नाही, तो संन्याशाच्या पवित्र जीवनाचा वाटेकरी होतो.

४. फुलातील रंग आणि गंध यांना धक्का न लावता भ्रमर जसा त्यातील मकरंद लुटून नेतो त्याप्रमाणे मुनीने गावात विहार करावा.

५. दुसऱ्यांचे दोष किंवा त्यांनी काय केले, काय केले नाही हे पाहण्यापेक्षा माणसाने मी काय केले, काय केले नाही इकडेच लक्ष द्यावे.

६. गंधहीन सुंदर फुलाप्रमाणे आचारहीन पुरुषाचे सुभाषित निरर्थकच असते.

७. रंगाने सुंदर व गंधाने मधुर असलेल्या फुलाप्रमाणे जो बोलतो, तशी कृती करतो, अशा आचारयुक्त पुरुषाचे बोल नेहमीच सफल होतात.

८. फुल मग ते चंदनाचे असो, तगरीचे असो वा चमेलीचे असो, वाऱ्याच्या उलट दिशेला त्याचा सुगंध जाऊ शकत नाही. संत-सज्जनांच्या सत्कीर्तीचा सुगंध मात्र वाऱ्याच्या उलट दिशेनेसुद्धा वाहत जातो. सत्पुरुषांचा कीर्तिसुगंध सर्व दिशांना व्यापून टाकतो.

९. चंदन, तगर, कमळ किंवा जाईजुई असो, या फुलांच्या सुगंधापेक्षा शीलाचा

सुगंध श्रेष्ठ असतो.

१०. तगरीचा किंवा चंदनाचा सुगंध अल्पमात्रच असतो, पण शीलवंताच्या सदाचाराचा सुगंध देवलोकातसुद्धा जाऊन पोहोचतो.

११. जागणाऱ्याला रात्र मोठी वाटते. थकलेल्या वाटसरूला आठ-दहा मैलांचे अंतर मोठे वाटते. सद्धर्म जाणत नाहीत त्यांना हा संसारही प्रदीर्घ वाटतो.

१२. हजार निरर्थक वचनांपेक्षा एक अर्थपूर्ण वचन श्रेष्ठ असते; जे ऐकून मन शांत होते.

१३. अर्थशून्य अशा शंभर गाथा तोंडपाठ म्हणण्यापेक्षा सार्थ असे एकच धर्मपद म्हणणे श्रेयस्कर असते.

१४. संग्रामात तलवार गाजवून हजारो मनुष्यांवर जय मिळवण्यापेक्षा ज्यामध्ये मनुष्य स्वत:लाच जिंकतो तो संग्रामच श्रेष्ठ असतो.

१५. दुसऱ्यांवर विजय मिळवण्यापेक्षा स्वत:ला जिंकणे अधिक श्रेयस्कर आहे. स्वत:वर नियंत्रण ठेवून जो विजयी झाला आहे त्याचा पराभव देवही करू शकत नाहीत. ज्याने आत्मविजय प्राप्त केला आहे तो अजिंक्य आहे.

१७. माळी पाटाने पाण्याला हवे तिथे नेतात, लोहार बाण सरळ करतात, सुतार लाकडाला हवा तसा आकार देतात त्याप्रमाणे सदाचारी लोक स्वत:वर संयम ठेवतात, नियंत्रण ठेवतात.

१८. अल्पज्ञान असलेला माणूस माजलेल्या बैलासारखा वाढतो. त्याचे मांस तेवढे वाढते. बुद्धी काही वाढत नाही.

१९. जो ब्रह्मचर्याचे पालन करीत नाही, तारुण्यात ज्याने धन मिळवले नाही, तो म्हातारपणी मासे नसलेल्या जलाशयातील क्रौंच पक्ष्याप्रमाणे चिंताग्रस्त होतो.

२०. माणसाने आधी स्वत:लाच उचित मार्गाला लावावे. जे योग्य आहे तेच करावे आणि मग दुसऱ्याला उपदेश करावा. असे केल्यानेच ज्ञानी लोकांना क्लेश भोगावे लागत नाहीत.

२१. जो आधी अविचारी असतो पण नंतर अविचाराने न वागून विचारी होतो तो ढगांपासून मुक्त झालेल्या चंद्राप्रमाणे जगाला प्रकाशित करतो.

२२. एकांताचा आणि शांतीचा रस पिऊन मनुष्य निर्भय होतो आणि धर्माचा

प्रेमरस पिऊन तो निष्पाप होतो.

२३. चंद्र नक्षत्रपथाचे अनुगमन करतो त्याप्रमाणे मनुष्याने धीर, ज्ञानी, बहुश्रुत, शीलसंपन्न, कर्तव्यशील अशा थोर सत्पुरुषांचा मार्ग अनुसरावा.

२४. जो मितभाषी असतो त्याची लोक निंदा करतात. जो बडबड करतो त्याचीही लोक निंदाच करतात. जो अजिबात बोलत नाही त्याचीही निंदा करतात. थोडक्यात काय तर निंदा होत नाही असा मनुष्य जगात नाही.

२५. सोनार जसा चांदीतला अशुद्ध भाग थोडा थोडा जाळून साफ करतो त्याप्रमाणे ज्ञानी माणसाने आपल्यात जे काही अशुद्ध शिल्लक आहे ते हळूहळू काढून टाकावे.

२६. लोखंडाचा गंज त्याच्यातून उत्पन्न होऊन त्यालाच जसा खातो, त्याप्रमाणे दुराचारी माणसाचे दुष्ट कर्मच त्याला विनाशाकडे नेते.

२७. रागासारखा अग्नी नाही. द्वेषासारखे दुर्दैव नाही. मोहासारखा पाश नाही आणि तृष्णेसारखी नदी नाही.

२८. दुसऱ्याचे दोष पाहणे सोपे आहे. पण आपले दोष पाहणे हे मोठे कठीण आहे. भुशाप्रमाणे दुसऱ्याचे दोष उधळीत मनुष्य गावभर हिंडत फिरतो. जुगारी जसा खोट्या दानाला लपवतो, त्याप्रमाणे आपले स्वत:चे दोष मात्र तो लपवून ठेवतो.

२९. शरद ऋतूतील कमल हाताने तोडून टाकावे, तसे आत्म्यावरील प्रेम खुडून काढा. आणि शांतिमार्गाकडे म्हणजे निर्वाणाकडे वळा.

३०. महापूर जसा सुप्त गावाला वाहून नेतो, त्याप्रमाणे ज्याचे मन पुत्र-पशू इत्यादिकांच्या प्रेमपाशात अडकून पडले आहे, त्याला मृत्युराज पकडून घेऊन जातो.

३१. प्रमाद करणारा व परदारागमन करणारा जो पुरुष आहे, त्याच्या या चार गती आहेत : १) त्याला पुण्य लाभत नाही, २) सुखाने झोप येत नाही, ३) लोकांत निंदा होते आणि ४) मरणोत्तर नरक प्राप्त होतो.

३२. शिकून सहनशील झालेल्या हत्तीला युद्धात घेऊन जातात. अशा संयत हत्तीवरच राजा आरोहण करतो. मनुष्यात जो स्वत:चे दमन करणारा आहे, तो श्रेष्ठ आहे. कारण तो दुसऱ्याचे कठोर भाषण सहन करतो.

३३. प्राचीन काळापासून लोक स्नान करीत आले आहेत. पण उदकाने काही

शुचिर्भूतता प्राप्त होत नाही. सत्य आणि सदाचरण ज्याच्यात आहे तोच शुचिर्भूत!

३४. शील, समाधी व प्रज्ञा ही ज्याची सुरक्षित आहेत, तो विषय-वासनांच्या बंधनातून मुक्त होऊन सूर्याप्रमाणे चमकू लागतो.

३५. जो निंद्य माणसाची प्रशंसा करतो व प्रशंसायोग्य माणसाची निंदा करतो तो आपल्या तोंडाने आपलीच हानी करून घेतो.

३६. जुगारात पैसे गमावणे ही हानी अल्पच आहे. पण जो साधुजनांविषयी आपले मन कलुषित करतो तो सर्वस्वाची हानी करून घेतो.

३७. निर्दोष, शुद्ध, निष्पाप माणसाला जो दोष देतो, त्याचे हे पापकृत्य वाऱ्यावर फेकलेल्या धुळीप्रमाणे त्याच्यावरच उलटते.

३८. कामसुख हा दुस्तर, ज्यातून बाहेर येणे शक्य नाही असा, चिखल आहे.

३९. जो धर्म जाणून अनाश्रित होतो तोच खरा विद्वान, वेदपारंगत होय.

४०. जो भूतकाळाला विसरून भविष्यकाळासाठी काही शिल्लक ठेवत नाही आणि वर्तमानकाळालाही पकडून बसत नाही तो उपशांत होऊन फिरत राहतो.

४१. ज्याला कोणत्याही वस्तूसंबंधी 'ही माझी' किंवा 'ही इतरांची' असे वाटत नाही व ज्याला ममत्वाची वेदना नाही, तो 'ही माझी वस्तू नष्ट झाली' असे म्हणून शोक करीत नाही.

४२. निर्भय आणि जाणत्या माणसाला कोणतीच वासना बांधून ठेवू शकत नाही.

४३. या जगात ज्याची सर्व इंद्रिये आटोक्यात आली आहेत, ज्याला इहलोक व परलोक दोन्हींचा उबग आला आहे त्याला दान्त म्हणावे.

४४. जो सर्व ठिकाणी उपेक्षायुक्त, स्मृतिमान होऊन कोणाचीही हिंसा करत नाही व ज्याला रागद्वेषादी उत्सद (लोभ, द्वेष, मोह, अहंकार, कुदृष्टी, क्लेश, दुश्चरित) नाहीत त्याला सुशांत म्हणावे.

४५. पुण्य-पापांचा त्याग करून शांत झालेला, जन्म-मरणाच्या पार गेलेला जो त्याला श्रमण म्हणावे.

४६. जो या लोकी कोणतेही पाप करत नाही, सर्व संयोग व बंधने सोडवून कोठेही बद्ध होत नाही, विमुक्त होतो त्याला या गुणांमुळे नाग म्हणावे.

४७. दिव्य, मानवी व ब्रह्मक्षेत्र ही तिन्ही क्षेत्रे जाणून त्यांच्या मूलबंधनापासून मुक्त झाला आहे त्याला क्षेत्रजिन म्हणावे.

४८. दिव्य, मानवी व ब्रह्मकोश हे तिन्ही कोश जाणून जो या कोशांच्या मूलबंधनापासून मुक्त झाला आहे त्याला कुशल म्हणावे.

४९. जो इहपरलोकी सर्व पापांपासून विरक्त होतो व सर्व दुःखांच्या पार जातो त्याला वीर्यवान म्हणावे.

५०. संसार व त्याबरोबर येणारे जन्म-मरण हे दोन्ही जाणून जो निष्पाप आणि विशुद्ध होऊन जन्मक्षय पावलेला आहे, त्याला बुद्ध म्हणावे.

१-३. ध.प. (यमकवग्गो), ४-१०. (पुप्फवग्गो),
११. (बालवग्गो), १२-१५. (सहस्सवग्गो), १६-१७. (दण्डवग्गो),
१८-१९. (जरावग्गो), २०. (अत्तवग्गो), २१. (लोकवग्गो),
२२-२३. (सुखवग्गो), २४. (कोधवग्गो), २५-२८. (मलवग्गो),
२९-३० (मग्गवग्गो), ३१. (निरयवग्गो), ३२. (नागवग्गो),
३३. उदान (जटिलसुत्त), ३४. (मारधेय्यसुत्त);
३५-३७. सु.नि. (कोकालियसुत्त), ३८-४२. (अत्तदण्डसुत्त),
४३-४९. (सभियसुत्त).

124284
31.3.08

आमची महत्त्वाची प्रकाशने

- **राजर्षी शाहू छत्रपती यांचे १०१ मौलिक विचार** / १५ रुपये
- **महात्मा जोतीबा फुले यांचे १०१ मौलिक विचार** / १५ रुपये
- **जोतीबा फुले आणि स्त्री-मुक्तीचा विचार** / गेल ऑम्व्हेट / २० रुपये
- **महात्मा फुले यांचे शैक्षणिक कार्य** / तानाजी ठोंबरे / २० रुपये
- **महात्मा फुले आणि शेतकरी चळवळ** / अशोक चौसाळकर / २० रुपये
- **जोतीरावांची समता-संकल्पना** / भा. ल. भोळे / २० रुपये
- **महात्मा फुले आणि सांस्कृतिक संघर्ष** / भारत पाटणकर / २० रुपये
- **महात्मा फुले आणि धर्म** / आ. ह. साळुंखे / २० रुपये
- **डॉ. आंबेडकर यांचे राजकीय विचार** / म. द. देशपांडे / ३० रुपये
- **डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या**
  कृष्णा मेणसे / ३० रुपये
- **डॉक्टर आंबेडकर चिंतन** / के
- **अशोकाचे शिलालेख** / बिंदा परांजपे / २० रुपये

Library IIAS, Shimla
MR 891.468 Sa 19 B
00124284

मूल्य : ४० रुपये

ISBN 81-88284-62-9